पनवेल (प्रतिनिधी) खारघरमधील सेक्टर १५ मध्ये स्पॅगेटी घरकुलजवळ महामार्गाला जोडणाऱ्या पादचारी पुलाच्या संरक्षण भिंतीच्या दुरूस्तीचे काम ताबडतोब करण्याचे आदेश वजा सुचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिल्यानंतर येत्या १० दिवसाच्या आत काम पूर्ण करण्याचे आश्वासन सिडकोचे अभियंता किरण फणसे यांनी दिले आहे.

मंगळवारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर सेक्टर १५ मध्ये सिडकोकडून भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर सिडकोचे लक्ष वेधून घेतले व नागरिकांना भेडसावणारे सर्व प्रश्न तातडीने सोडविण्याचे आदेश सिडकोच्या अधिकाऱ्यांना दिले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथील नागरिकांचे प्रश्न मार्गी लागण्याकरिता घेतलेल्या रोखठोक भुमिकेमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

खारघरमधील सेक्टर १५ मध्ये घरकुल येथे तलावाजवळून महामार्गाला जोडणारा पादचारी पुल असून या पुलाखालून मोठया प्रमाणात पाणी वाहत असते. या पुलाजवळ असलेली संरक्षण भिंत ढासळली असल्याने त्याच्याबरोबरीने रस्ताही खचला आहे, त्यामुळे पादचाऱ्यांना येथून ये-जा करताना त्रास होत आहे. तसेच ऐन पावसाळयात या पुलाखालून पाण्याचा प्रवाह मोठया प्रमाणात होणार असून संरक्षण भिंत व रस्त्याची दुरूस्ती न केल्यास पुल ओलांडण्यावेळी मोठया प्रमाणात अपघात होऊ शकतात, याची जाणिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना करून दिली. त्याचबरोबर येथील सोसायटींना कमी दाबाने होणाऱ्या पाणी पुरवठयाबाबतही लक्ष वेधून येत्या सात दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासनही सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून घेतले. यावेळी खारघर कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सुनिल सावर्डेकर, उमेश पाटील, किर्ती नवघरे, सुभाष मोरजकर, मनिष कुळे, सचिन सावंत यांच्यासह नागरिक उपस्थित होते.